/ त्यास्तील अंमलदार



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** पालघर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0277 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/12/2023 17:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 20/11/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2023

**Time From (वेळेपासून):** 14:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/12/2023 **Time (वेळ):** 17:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/12/2023 17:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राज्य उत्पादन शुल्क ,पालघर यांचे कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अभिजीत नंदकुमार मोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडराई,मच्छी मार्केटच्या जवळ,सातपाटी, पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | वडराई,मच्छी मार्केटच्या जवळ,सातपाटी, पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9209271421

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन बाबु संखे | | | १. सी 201,वरद हॉस्पिटल जवळ बोईसर पश्चिम,सिध्दी विनायक अपार्टमेंट,बोईसर पश्चिम, पालघर,पालघर,पालघर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद                    दिनांक 07/12/2023.

मी अभिजीत नंदकुमार मोरे, वय -43 वर्षे, जात – हिन्दु भंडारी धंदा. किराणा मालाचे दुकान, रा.वडराई,मच्छी मार्केटच्या जवळ सातपाटी पालघर ता.जि.पालघर मो. 9209271421 समक्ष समक्ष फिर्याद लिहून देतो की, मी वर नमुद ठिकाणी राहण्यास असून माझे किराणा मालाचे दुकान आहे. त्या ठिकाणी मला नविन बियर शॉप सुरू करावयाचे असल्याने मी माझी पत्नी श्रीमती अभिज्ञा अभिजीत मोरे यांच्या नावे नविन बियर शॉपचे लायसन्स मिळण्याकरीता मी जानेवारी 2023 मध्ये राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात अर्ज केलेला होता. व त्यासोबत आवश्यक ते सर्व कागदपत्र सादर केलेले आहेत. त्यानंतर मी जानेवारी 2023 पासून बियर शॉप च्या लायसन्सच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क , पालघर कार्यालयातील नितीन संखे यांना भेटून त्यांनी सांगीतल्याप्रमाणे आवश्यक सर्व कागदपत्र दिले. त्यानंतर मी माहे नोव्हेंबर 2023 मध्ये श्री.नितीन संखे यांना भेटलो असता त्यांनी बियर शॉपच्या लायसन्स साठी माझेकडे 4,00,000/- रू लाचेची मागणी केली परंतू मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 20/11/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात हजर राहून स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिलेली होती. व त्यासोबत माझी पत्नी अभिज्ञा हिचे अधिकार पत्र जोडलेले होते.

त्यानंतर दिनांक 20/11/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी दोन शासकीय पंच साक्षीदार मागवून त्यांची माझेशी ओळख करून दिली. तसेच मी दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचण्यास देवून त्यावर त्यांच्या सहया घेतल्या.

त्यानंतर दिनांक 20/11/2023 रोजी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करणेकामी माझा मोबाईल क्र. 9209271421 वरून श्री.नितीन संखे यांच्या मोबाईल क्रमांक 9967838011 यावर फोन करून त्यांना भेटण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला दिनांक 21/11/2023 रोजी भेटण्यास येण्याबाबत सांगीतले. फोनवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डर द्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले असून तसा दिनांक 20/11/2023 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 21/11/2023 रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून मला पंच नं. 01 यांचेसह श्री.नितीन संखे यांना भेटण्यास राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात पाठविले असता, त्यावेळी श्री.नितीन संखे यांनी माझे कामाच्या अनुषंगाने ''कसं काय करायचं झालं तुमची काय तयारी'' असे विचारल्याने मी त्यांना तुम्ही चार लाख सांगीतले होते पण तेवढी सोय नाय होत, तिन पर्यंत झाली माझेकडे असे बोललो. त्यावर श्री.नितीन संखे यांनी ''तीन नाही.... चार.... लास्ट तीन चाळीस पर्यंत... ओके'' असे म्हणून सुरुवातीला 4,00,000/- रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून नंतर 3,40,000/- रू स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी ''तिन चाळीस... आता आपलं काय आहे?'' असे विचारले असता, मी त्यांना तीन ची तयारी आहे तीन रेडी झालेत असे सांगीतले. तेंव्हा श्री.नितीन संखे यांनी ''नाय नाय... नाय होत ना ते आम्हाला तिकडे पण हे करावं लागतात... सांग मग काय... बघु आम्ही... तुझं काय तरी क्युरी काढलं वाटतय ते काय ते पेपर डॉक्युमेंट हे करावं लागेल'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना सर चाळीस तुम्ही अॅडजस्ट करेल... आता एवढे कमी केले तर चाळीस हजार ते पण सर कमी करा... तीन मध्ये करा... तीन लाख बस झाले ना सर असे म्हटले असता, नितीन संखे यांनी ''नाय नाय... नाय होत मी तर आता मी माझ्या हयाच्याने केले होते, ते ऐकतच नव्हते'' असे सांगीतले तेंव्हा मी त्यांना कोण पाटील सर असे विचारले असता, त्यांनी '' हं'' म्हणून ''त्याच्यात तुम्ही सांगीतले तेवढयांत नाय होत'' असे म्हणून ''असेल तर सांग लवकर'' बोलले त्यावर मी त्यांना चालेल देतो असे म्हणून कधी दयायचे सांगा असे विचारले. तेंव्हा त्यांनी ''आज आज... आज दिले तर आज चालेल... दया तुम्ही तुमच्या हिशोबाने करून'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना कुठे दयायचे असे विचारले असता, त्यांनी ''तु आता विश्वासाच्या लायक आहे... कुठे पण घेवून ये चल तु सांग. असे बोलले. त्यावर मी त्यांना इथे नको आमच्या गावातले आहेत



Scanned with CamScanner

ना... असे सांगीतले तेंव्हा ते मला ''तु मला फोन कर'' असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना हॉटेल मध्ये किंवा डेअरी मध्ये असे विचारले त्यावर त्यांनी ''तु कुठे सांगेल तिकडे सांग... आता घेवून येईल का? किती वेळाने?'' असे विचारले. त्यावर मी त्यांना एक तासात येवू असे बोललो तेंव्हा त्यांनी ''हा चालेल'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना घरी जावून घेवून येतो असे म्हटले त्यावेळी त्यांनी मला ''मग आता पुर्ण आहे ना तेवढं... तेवढं घेवून ये पण'' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना चालेल मी येतो असे म्हणून माझे वडीलांकडून घेवून येतो असे सांगून निघून आलो. त्यानंतर मी त्यांना एक तासात येतो असे सांगून तेथून निघून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात आलो. सापळा कारवाई कामी लागणारी रक्कम मला माझे वडील देणार होते म्हणून मी माझे मित्राला संपर्क करून माझे वडीलांकडून 3,40,000/- रू घेवून येण्यास सांगीतले. त्यावेळी माझे मित्राने मला सांगीतले की, माझे वडील खुप मद्यपान करून झोपलेले असल्यामुळे त्यांच्याकडून सध्या सापळा कारवाई करीताची रक्कम मिळणार नाही. त्यामुळे तात्काळ सापळा कारवाई करणे शक्य नसल्याने मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांना केलेल्या विनंतीवरून त्यांनी पंचांशी चर्चा करून माझे मोबाईल नंबरवरून श्री.नितीन संखे यांना फोन करून दिनांक 22/11/2023 रोजी सकाळी लाचेची रक्कम देण्याकरीता वेळ मागून घेण्याचे ठरविले. व त्याप्रमाणे माझा मोबाईल नंबर 9209271421 वरून श्री.नितीन संखे यांच्या मोबाईल नंबर 9967838011 वर फोन करून त्यांनी मागणी केलेली लाचेच्या रक्कम सध्या उपलब्ध होत नसल्याचे सांगीतले. त्यावेळी ते ''मग उदया करा ना'' असे बोलले. तसेच तीन लाख चाळीस हजार सांगीतलेत त्याच्याव्यतिरीक्त कोणाला काय दयावे लागणार नाही ना? असे विचारले असता, श्री.नितीन संखे यांनी ''नाय नाय'' असे म्हणून दिनांक 22/11/2023 रोजी लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. सदरच्या पडताळणी कारवाई दरम्यान समक्ष तसेच फोनवर झालेले संभाशण व्हॉईस रेकॉर्डर द्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले असून तसा दिनांक 21/11/2023 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 22/11/2023 रोजी सकाळी सुध्दा माझे वडीलांच्या अति मद्यपानामुळे मला सापळा कारवाई करीता लागणा-या 3,40,000/- रू रक्कम वेळेत उपलब्ध झाली नाही. त्यानंतर दुपारी माझे वडील झोपेतून उठल्यानंतर त्यांनी मला 2,00,000/- रू रक्कम दिली. त्यावेळी मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचेषी संपर्क साधून फक्त दोन लाख रूपये उपलब्ध झाल्याचे सांगून तेवढया रक्कमेवर आपल्याला लाचेचा सापळा आजमाविता येईल येईल का? असे विचारले असता, त्यांनी उपलब्ध झालेली रक्कम घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालया येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी उपलब्ध झालेले दोन लाख रूपये घेवून दुपारी 14.30 वा. च्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी दोन्ही पंच व माझेषी चर्चा करून माझेकडे उपलब्ध झालेल्या 2,00,000/- रू रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करून सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर मी हजर केलेल्या 2,00,000/- रू रक्कमेवर दोन पंचांसमक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आली. त्यानंतर श्री.नितीन संखे हे त्यांच्या कार्यालयात आहेत का? याची खात्री करण्यासाठी त्यांच्याषी मोबाईलवरून बोलणी करण्याचे ठरविले. व त्यानंतर 16.01 वा. च्या सुमारास माझे मोबाईल नंबर 9209271421 वरून श्री.नितीन संखे यांच्या मोबाईल नंबर 9967838011 वर फोन केला असता श्री.नितीन संखे यांनी माझा मोबाईल ब्लॉक केल्याचे आढळून आले. सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डर द्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात येथील श्री. प्रमोद पाटील यांना फोन करून श्री.नितीन संखे यांचेषी बोलणी करून देण्यास बोललो. त्यावेळी त्यांनी सांगीतले की, श्री.नितीन संखे हे कार्यालयात हजर नसून ते कामानिमित्त बाहेर कोठेतरी गेले आहेत. तसेच श्री.प्रमोद पाटील यांना श्री.नितीन संखे हे कार्यालयात आल्यास त्यांच्याशी बोलणी करून देण्यास सांगीतले. परंतू श्री.प्रमोद पाटील यांनीही त्यानंतर कार्यालयीन वेळ संपेपर्यंत मला फोन केला नाही. त्यामुळे लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. तसा दिनांक 22/11/2023 रोजीचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मी माझे कामाच्या अनुशंगाने श्री.नितीन संखे यांची भेट घेण्याचा तसेच संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतू माझी त्यांच्याशी भेट झाली नाही. तसेच श्री.नितीन संखे यांनी माझ्या बियर शॉपच्या लायसन्स करीता पैशाची मागणी करूनही ते पैसे (लाच) घेण्यास मला टाळत असल्याचे जाणवले.

त्यानंतर दिनांक 02/12/2023 रोजी राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयातील श्री.प्रमोद पाटील यांनी माझे मोबाईलवर फोन करून मला राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात बोलवून घेवून कार्यालय प्रमुख श्री. बाळासाहेब पाटील यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी श्री.बाळासाहेब पाटील यांना भेटलो, तेंव्हा श्री.बाळासाहेब पाटील यांच्या टेबलवर माझे पत्नीच्या नावे अर्ज केलेले बियर शॉप च्या लायसन्स चे प्रकरण असल्याचे मी पाहीले. त्यावेळी श्री.बाळासाहेब पाटील यांनी मला नविन बियर शॉप च्या लायसन्स चे प्रकरण श्री.नितीन संखे यांचेकडून



Scanned with CamScanner

काढून घेवून त्यांच्याकडे दिल्याचे सांगून लायसन्स काढण्याकरीता जेवढी शासकीय फी असेल तेवढी ऑनलाईन भरल्यानंतर तुमचे लायसन्स 8 दिवसात मिळेल असे सांगीतले.
त्यानंतर दिनांक 06/12/2023 रोजी पुन्हा श्री.प्रमोद पाटील यांनी मला फोन करून माझ्या पत्नीसह मला राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात बोलावून घेतले. व नविन बियर शॉपच्या लायसन्स करीता लागणारी शासकीय फी भरून घेतल्यानंतर माझी पत्नी अभिज्ञा मोरे हिच्या नावे नविन बियर शॉप चे लायसन्स मला दिले.
दिनांक 21/11/2023 रोजीच्या पडताळणी कारवाई नंतर माझेकडे सापळा कारवाई करीता लागणारी रक्कम उपलब्ध न झाल्याने नितीन संखे यांचेकडून वेळा मागून घवून त्यांनी दिलेल्या वेळेनुसार दुस-या दिवशी दिनांक 22/11/2023 रोजी सुध्दा माझेकडे सदरची रक्कम उपलब्ध न झाल्याने लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यामुळे बहुतेक श्री.नितीन संखे यांना संशय आला असण्याची शक्यता आहे. म्हणून त्यांनी माझा फोन नंबर ब्लॉक केलेला आहे.
त्यानंतर दिनांक 06/12/2023 रोजी नविन बियर शॉप च्या लायसन्स करीता ची शासकीय फी भरल्यानंतर मला नविन बियर शॉप चे लायसन्स मला मिळाले आहे. त्यामुळे माझे सध्या श्री.नितीन संखे तसेच राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयात कोणतेही काम प्रलंबित नाही. त्यामुळे श्री.नितीन संखे हे माझेकडून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता वाटत नसल्याने मी दिनांक 06/12/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाकडे श्री.नितीन संखे यांचेविरूध्द योग्य ती कारवाई होणेकामी जबाब लिहून दिलेला होता.
एकंदरीत मी दिनांक 20/11/2023 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नविन बियर शॉप चे लायसन्स देण्यासाठी दिनांक 21/11/2023 रोजी राज्य राज्य उत्पादन शुल्क, पालघर कार्यालयातील श्री.नितीन संखे यांनी माझेकडे सुरवातीला 4,00,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3,40,000/- रू स्विकारण्याचे मान्य केले म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.
सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचली, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष हे लिहून दिले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DATTATRAY BAJIRAO KINDRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): DATTATRAY BAJIRAC
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner